# " डोळे "

या डोळ्यांची होऊ कशी उतराई
त्यांच्यामुळेच बघते जगातील सर्व कांही -----

बालपणीचे अल्लड हसणे रुसणे
आई बाबांच्या नजरेतील कौतुक सोहळे
अनुभवले याच डोळ्यांनी !! ----

मित्र मैत्रिणी, नातलगांचा स्नेह
शाळा, शिक्षक, समाज, रम्य परिसर
डोळे भरून पाहयला याच डोळ्यांनी !! -----

स्नेह, प्रेम, अभिमान लडिवाळ
साठविला खोल खोल, डोळ्यातूनच हृदयात
राग, द्वेष, तिरस्कारही कधीतरी
अश्रुसहित टिपला याच डोळ्यांनी !! ------

कौशोर्यवय संपताच समजली नयनांची भाषा
मौनातूनही उमगला अर्थ अस्फूट प्रेमाचा
नजरानजरेचे गुपित केले उघड, याच डोळ्यांनी !! ----

संसारातील क्षणचित्रे उमटली
डोळ्यातून कधी हासून, कधी रडूनी
नवीन नाती जुळली तर कांही
नजरेच्या टप्प्यातून कायमचे दिसली !!

उपनेत्राने झाली जाणीव वार्धक्याची
हजेरी त्यातच लागली 'मोतीबिंदूची'
कुशल नेत्रसर्जनाने करीनाच दूर अडसर
सगळ्यांचे झाले पुन्हा दर्शन याच डोळ्यांनी !! ----

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी.